# ॲनी बेझंट यांच्या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा अभ्यास...

सोमेश कल्लाप्पा जाधव
बी.ए. भाग -२ – इतिहास,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
jadhavsomesh42@gmail.com

**घोषवारा:-**

इतिहास म्हणजे अनेक घटनाक्रमांचा अभ्यास करणे होय. त्याचप्रमाणे भारताचा इतिहास हा अनेक समाजसुधारक आणि क्रांतीकारकांमुळे समृद्ध बनला आहे. भारताला स्वातंत्र्य देण्यासाठी अनेक क्रांतिकारक, समाजसुधारक व स्वातंत्र्यसैनिक पुढे आले. यामध्ये आयर्लंड देशाची कन्या ॲनी बेझंट यांचे महत्त्वाचे योगदान स्वातंत्र्यासाठी मिळाले आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये विदेशी महिलांचा सहभाग ही एक महत्वपूर्ण बाब आहे. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक चळवळी उदयास आल्या. त्यातच एक महत्त्वपूर्ण होमरूल चळवळ भारतात झाली. ॲनी बेझंट यांनी लोकमान्य टिळक यांच्या मदतीने होमरूल चळवळ सुरू केली. होमरूल म्हणजे स्वराज्याची प्राप्ती होय. त्याचबरोबर थिओसॉफिकल सोसायटीच्या सदस्य बनल्या. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून बहुमान त्यांना मिळाला. त्यांनी कुटुंब नियोजनाचा पुरस्कार करणारा 'द फ्रुट्स ऑफ फिलॉसॉफी' हा निबंध लिहिला. ॲनी बेझंट यांच्या क्रांतिकारी चळवळीचा शोध निबंधात अभ्यास करता येणार आहे.

**कळीचे मुद्दे:** भारतीय स्वातंत्र्यलढा, आयर्लंड, होमरूल चळवळ, थिओसॉफिकल सोसायटी, एकनिष्ठ...

**प्रस्तावना:-**

ॲनी बेझंट या मूळच्या आयर्लंड येथील रहिवाशी होत्या. ॲनी बेझंट यांचे पूर्ण नाव आणि ॲनी फ्रँक बेझंट असे होते. हे नाव लग्नाच्या नंतरचे होते. ॲनी बेझंट यांचा जन्म १ आक्टोंबर १८४७ रोजी लंडन (इंग्लंड) या शहरात झाला. ॲनी यांच्या आईचे नाव एमिली असे होते, आणि वडिलांचे नाव विलियम पेजवूड असे होते. बेझंट यांच्या वयाच्या पाचव्या वर्षी त्यांच्या वडिलांचे मृत्यू झाले. यांचे शिक्षण इंग्लंड आणि जर्मनी या ठिकाणी झाले. त्यांचे शिक्षण इंग्लंड आणि जर्मनी मध्ये झाल्यामुळे त्यांना जर्मनी आणि फ्रेंच या भाषा अवगत होत्या. १८६७ साली वयाच्या विसाव्या वर्षी इंग्लंडमधील तरुण फ्रँक बेझंट यांच्यासोबत विवाह झाला. परंतु पती-पत्नीच्या तणावामुळे १८७७ मध्ये त्यांनी घटस्फोट घेतला. त्या जन्माने ख्रिश्चन व मनाने हिंदू असे त्या स्वतःबद्दल नेहमी म्हणत. त्यांनी होमरूल चळवळीद्वारे आयर्लंडच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी प्रयत्न केले. त्यांचे भारतामध्ये आगमन १८९३ मध्ये झाले. त्या भारतीय राजकारणासाठी एकनिष्ठ होत्या. १९०७ मध्ये जागतिक सोसायटीचे अध्यक्ष बनल्या. १९१४ मध्ये न्यू इंडिया हे वृत्तपत्र काढले. त्याच बरोबर राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या पहिल्या महिला अध्यक्ष १९१७ साली बनल्या. प्रस्तुत शोधनिबंधातून आणि ॲनी बेझंट यांच्या भारतातील कार्याचा अभ्यास केला जाईल.

**हिंदू धर्म व संस्कृतीसाठीचे कार्य:**

१८९३ साली शिकागो येथे झालेल्या धर्म परिषदेमध्ये भाग घेतला. मॅडम ब्लेव्हेंटस्क्री आणि कर्नल अकाउंट यांनी स्थापन केलेल्या थिओसोफिकलच्या सदस्य बनल्या. १८९३ साली शिकागो येथे झालेल्या धर्म परिषदेमध्ये भाग घेतला. इ.स. १८७५ मध्ये चार्ल्स ब्रॅडलाफ या समाजवादी विचारवंताबरोबर त्यांनी कुटुंब नियोजनाचा पुरस्कार करणारा 'द फ्रुट्स ऑफ फिलॉसॉफी' हा प्रबंध लिहिला. या लिखाणाबद्दल दोघांना सहा महिन्याच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली. नंतर अपिलात ही शिक्षा रद्द करण्यात आली. हिंदू आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचा त्यांनी पुरस्कार केला. जे. कृष्णमूर्तींना त्यांनी आपला मानसपुत्र मानले. भारतीय संस्कृतीचा त्यांनी प्रगाढ अभ्यास केला. शिक्षण, समाजसुधारणा, स्वतंत्रता आंदोलनात त्यांनी भाग घेतला.

**होमरूल लीग:-**

आयरिश विदुषी डॉ. ऍनी बेझंट यांनी १९१५ मद्रास या प्रांतातील अड्यार मध्ये होमरूल लीग ची स्थापना केली. त्याचबरोबर १९१६ मध्ये लोकमान्य टिळक आणि ऍनी बेझंट यांनी संयुक्तपणे होमरूल चळवळ सुरुवात केली. होमरूल लीगच्या मागण्या अशा होत्या की, भारतीय जनतेला राजकीय हक्क आणि प्रतिनिधीक संस्था अधिक व्यापक म्हणून त्यांचे अधिकार वाढ झाले पाहिजेत. होमरूल चळवळीमुळे स्वराज्याच्या हक्काची जाणीव निर्माण होऊन मवाळवादी आणि मुस्लिम लीगचे नेते आकर्षित झाले. आयर्लंड मधील होमरूलच्या धरतीवर ही चळवळ आधारित होती, आणि याचे पडसाद भारतामधील होमरूल चळवळ वरती पडले.

**भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्ष:**

१९१६ मध्ये लोकमान्य टिळक यांनी महाराष्ट्रात होमरूल लीगची (स्वराज्य संस्था) स्थापन केली. त्याच्यामध्ये बेळगाव येथे झालेल्या सभेत लोकमान्य टिळकांनी असे म्हटले की "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवणारच." जोसेफ बप्टीस्टा यांनी बेळगाव येथील होमरूल शाखा सांभाळली. बप्टीस्टा यांना "फादर ऑफ होमरूल इन इंडिया" असे म्हटले जाते. होमरूल ची व्याप्ती बघून ब्रिटिश सरकारने लोकमान्य टिळकांना पंजाब आणि दिल्ली येथे प्रवेश बंदी केली होती.होमरूलच्या वाढत्या यशामुळे ॲनी बेझंट यांची १९१७ च्या कोलकत्ता येथे झालेल्या राष्ट्रीय कॉंग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्ष पदी निवड झाली आणि त्या पहिल्या महिला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्ष बनल्या.

**थिऑसॉफिकल सोसायटी:-**

थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना १८७५ साली अमेरिकेतील न्यूयॉर्क या शहरात झाली. थिऑसॉफि हा शब्द ग्रीक आहे या शब्दाचा अर्थ परमेश्वरीय ज्ञान असे आहे. या सोसायटीचे उद्देश प्राचीन भारतीय संस्कृतीची जोपासना करणे व भारतीयांना त्यांचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशाने या संस्थेची स्थापना करण्यात आली. १८७९ मध्ये कर्नल अलकॉट व मॅडम ब्लॅव्हतस्की स्वामी दयानंद यांच्या निमंत्रणावरून भारतात आले. १८८२ साली मद्रास प्रांतातील अड्यार येथे थिऑसॉफिकल सोसायटीचे केंद्र स्थापन करण्यात आले. ॲनी बेझंट १८९३ मध्ये भारतात आल्या. त्या १९०७-३३ या काळात थिऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्ष होत्या. काही काळ आर्य समाजासोबत काम करणाऱ्या थिऑसॉफिकल सोसायटीची समाजसुधारणापेक्षा प्राचीन भारतीय संस्कृतीचा जोपासण्याचे अधिक भर होता. प्रकारे भारतामध्ये थिऑसॉफिकल सोसायटी रुजत गेली.

**निष्कर्ष:-**

ॲनी बेझंट यांनी होमरूल लीगची स्थापना करून भारतीय स्वातंत्र्य लढ्यास प्रेरित केले. ॲनी बेझंट या एक, समाजसुधारक, राजकीय नेत्या आणि उत्कृष्ट वक्त्या देखील होत्या. याचा फायदा त्यांना राजकीय क्षेत्रामध्ये झाला. वरील माहितीच्या आशयानुसार असे निष्कर्ष सांगता येईल की ॲनी बेझंट या भारतीय स्वातंत्र्य लढ्यात लोकमान्य टिळकांसमवेत अग्रभागी होत्या. त्यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान बहुमूल्य आहे. एकेठिकाणी त्या म्हणतात की, मी जन्माने जरी ख्रिश्चन असले तरी मन हिंदू आहे. या वाक्यातून त्यांचे भारतावरती असलेले प्रेम आणि जिव्हाळा दिसून येते. ॲनी बेझंट याचा राजकीय क्षेत्रातसुद्धा सक्रिय सहभाग होता. त्यांनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून कलकत्ता येथे झालेल्या अधिवेशनात मान मिळवला.ॲनी बेझंट या समाजसुधारक स्त्रीनेत्या, राजकीय नेत्या व त्याचबरोबर क्रांतिकारक म्हणून भारतात ओळखल्या जातात.

**संदर्भ:**

1. गांधी नंदिता, शाह नंदिता (१९९४), स्त्री संघर्षाची नवी रूपे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
2. खडपेकर विनया (१९९१), स्त्री स्वातंत्र्यवादिनी , विसाव्या शतकातील परिवर्तन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
3. खाडिलकर उषा (१९९९), स्त्रीमुक्ती कुतुहूल, वसंत बुक स्टॉल, मुंबई.